# नवे व सुधारित टॅली व्यवसाय व्यवस्थापन सॉफ्टवेअर

भारताची आघाडीची बिझनेस मॅनेजमेंट सॉफ्टवेअर कंपनी असलेल्या 'टॅली सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड'ने 'टॅली.ईआरपी ९ सीरिज ए रिलीज ३.०' हे नवे सुधारित सोल्युशन सादर केले आहे. व्यवसायाच्या अखंड अंमलबजावणीच्या हेतूने त्याची खास रचना करण्यात आली आहे. यात अनेक वैशिष्ट्ये व सुधारित सुविधा आहेत. 'टॅली.ईआरपी ९' मध्ये रुपयाचे नवे चिन्ह अंतर्भूत करण्यात आले आहे. द्विदिश भाषा वैशिष्ट्यामुळे सोल्युशनची व्याप्ती आता पश्चिम आशियापर्यंत वाढली आहे. 'जॉब वर्क' वैशिष्ट्यामुळे व्यवसाय प्रक्रिया, तर 'इन्कम टॅक्स फॉर पेरोल' वैशिष्ट्यामुळे वेतन तपशील प्रक्रिया अत्यंत सोप्या झाल्या आहेत. या सर्व वैशिष्ट्यांमुळे टॅली हे आता भारताचे सर्वाधिक सर्वंकष असे व्यवसाय व्यवस्थापन सॉफ्टवेअर ठरले आहे.

या संदर्भात कंपनीचे सहयोगी उपाध्यक्ष अरविंद के. एस. म्हणाले, की या नव्या सोल्युशनमुळे रुपयाचे नवे चिन्ह वापरता येणार असल्याने उद्योगांची आऊटपुट केपॅबिलिटीबाबतची तीव्र गरज पूर्ण झाली आहे. 'टॅली'ने आता आंतर चलन परिवर्तनाची (इंटर करन्सी कन्व्हर्जन) सोय उपलब्ध करून दिली आहे. ग्राहकाने एक मूळ चलन (उदाहरणार्थ- रुपया) निवडल्यास त्यांच्या व्यवसायाच्या सर्व आंतरराष्ट्रीय शाखांचे अहवाल मूळ चलनात परिवर्तित करून मिळतात. म्हणजेच एखाद्या ग्राहकाची शाखा कार्यालये युनायटेड किंग्डम (यूके) व अमेरिका येथे आहेत. तेथून आलेले अहवाल हे पौंड अथवा डॉलर मूल्यांतून रुपयात परिवर्तित होतात. अर्थातच ही सुविधा वापरताना सध्याच्या चलन विनिमयाचा दर या प्रणालीत भरणे गरजेचे असते.

'टॅली सोल्युशन्स'चे अध्यक्ष शोएब अहमद म्हणाले, की बहुतेक वेळा साध्या सोप्याची गल्लत मूळ तत्त्वाशी केली जाते. 'टॅली.ईआरपी ९' हे वापरण्यास अत्यंत सोपे तरीही सर्वंकष असे सोल्युशन आहे. क्लिष्टता टाळून साधे सोपे, लवचिक व कामाच्या सोयींनी समृद्ध असे उत्पादन देणे यावर आम्ही भर दिला आहे. रुपयाचे नवे चिन्ह, आऊटसोर्सड मॅन्युफॅक्चरिंग व अरेबिकसाठी जॉब वर्क सुविधा अशा वैशिष्ट्यांमुळे या सोल्युशनची कार्यक्षमता कमालीची वाढली आहे.

'टॅली.ईआरपी ९' सोल्युशन उजवीकडून डावीकडे लिपीचा वापर करणाऱ्या भाषांशी सुसंगत आहे. उदाहरणार्थ, डिस्प्ले लँग्वेज म्हणून अरेबिक अशी निवड केल्यावर हे सोल्युशन आपोआप उजवीकडून डावीकडे अशा लिपीत स्थित्यंतरित होते. बाकी सर्व कामकाज अथवा अहवालांना धक्का पोहोचत नाही. याचा फायदा विशेषतः पश्चिम आशियातील व्यवसायांना होणार असून ते आता उर्वरित जगाशी अधिक सहजतेने संवाद साधू शकतील, अरेबिकमधून इंग्रजीत अथवा इंग्रजीतून अरेबिकमध्ये अहवाल पाहू शकतील व छापून घेऊ शकतील.

या सोल्युशनमधील 'बँकिंग मोड्युल'मुळे व विशेषतः तारीख, भरणा साधने (पेमेंट मोड) किंवा व्यवहारांची साधने अशा फिल्टर्समुळे व्यवहारांची नोंद, अंमलबजावणी, देखरेख अगदी सोपी झाली आहे. रिकन्सिल न झालेले बँक व्यवहार चालू वर्षातून पुढील वर्षात आपोआप कॅरी फॉरवर्ड होत असल्याने वेळ वाचतो, चुका कमी होतात व उत्पादकता वाढते.

सुधारित चेक प्रिंटिंग कॉन्फिगरेशन वैशिष्ट्यात स्वतंत्र चेक प्रिंटिंग अहवाल आहे, ज्यामुळे विविध धनादेशांची छपाई सहजपणे करता येते. यात अनोखा फायदा असा, की छपाईनंतरही धनादेशाचे तपशील नोंदवून ठेवता येतात.

'जॉब वर्क मोड्युल'मुळे व्यवहारचक्र कालावधी (सायकल टाइम) कमी होतो, कार्यक्षमता वाढते व खर्च कमी होतो. मॅन्युफॅक्चरिंग वर्क फ्लो सहजपणे निर्माण करण्याची आणि इन्व्हेंटरी मॅनेजमेंटही सोपे करण्याची क्षमता या सोल्युशनमध्ये आहे. मल्टिपल ऑर्डर ट्रॅकिंग, वर्क-फ्लो-प्रोग्रेस टप्प्यांचे ट्रॅकिंग अथवा फिनिश्ड गुड्सच्या स्थितीचे विश्लेषण याही बाबी सोप्या ठरतात. त्यामुळे मालाच्या साठ्याचे मूल्यांकन असो, फिनिश्ड गुड्सवरील नफा विश्लेषण असो किंवा बिल ऑफ मटेरियल तयार करायचे असो, जॉब वर्क ही सुविधा या सर्व गोष्टी अखंड करत राहते.

'इन्कम टॅक्स फॉर पेरोल' या वैशिष्ट्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वेतनाची प्रक्रिया अडथळामुक्त बनते. वेतनावरील कराचा हिशेब करता येतो आणि प्राप्तिकर विवरण (रिटर्न) सादर करता येते. यात १६ ए, फॉर्म १२ बीए, पीएफ, ईएसआय, पीटी, ग्रॅच्युइटी अशा नियमांशी सुसंगतताही राखलेली आहे. या वैशिष्ट्यामुळे सर्व माहितीसाठी कर्मचाऱ्याला थेट मेल करता येत असल्याने कागदपत्रांचा व्याप वाचतो. एमआयएस रिपोर्ट तयार करण्यासाठीचे सर्व बारीकसारीक तपशील यात ध्यानात ठेवण्यात आले आहेत. विभागनिहाय वेतनातील बदल, विशिष्ट विभागातील अथवा गटातील कर्मचाऱ्यांच्या वेतनात झालेले बदल यात साठवता येतात.

'इमेज प्रिंटिंग' सुविधेमुळे एखादा कर्मचारी आपल्या कंपनीचा लोगो इन्व्हॉइसवर अथवा अहवालावर छापून घेऊन शकतो. ऑर्डर्सच्या प्री क्लोजरमुळे कोणत्याही अतिरिक्त एंट्री न करता आणि सध्याच्या ऑर्डरमध्ये बदल न करता प्रलंबित ऑर्डर्सचे क्लोजिंग शक्य होते. यामुळे प्रलंबित ऑर्डर्सचा तपशील राखून डेड स्टॉकमुळे होणारा तोटा रोखणे शक्य होते.

कंपनीच्या प्रचंड प्रगतीला विविध संशोधन संस्था व प्रसारमाध्यमांकडून प्रशंसेची पावती मिळाली आहे. टॅली ही भारतातील झपाट्याने विस्तारणारी सॉफ्टवेअर प्रॉडक्ट कंपनी असल्याचा उल्लेख या संस्थांनी केला आहे. साधेपणाची ताकद (पॉवर ऑफ सिम्प्लिसिटी) हे या कंपनीचे मध्यवर्ती तत्त्वज्ञान आहे. टॅली सोल्युशन्सने अकाऊंटिंग व बिझनेस मॅनेजमेंट सॉफ्टवेअरमध्ये कोड-लेस संकल्पना प्रवर्तित केली आहे आणि सातत्याने नवे तंत्रज्ञान, अनोखी वैशिष्ट्ये व कार्यक्षमता देऊ केल्या आहेत. टॅलीला तिच्या योगदानासाठी अनेक पुरस्कार मिळाले आहेत. ■